# लातूर शहर महानगरपालिका, लातूर
## एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी
## राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान
## कंत्राटी पदभरती जाहीरात
## Walk-in-Interview

दिनांक ०९/०८/२०२४ जा क्र २६८

राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमासाठी खालील तक्त्यांत दर्शविल्याप्रमाणे कंत्राटी पध्दतीने करार तत्वावर नियुक्ती करण्यासाठी दि. 27/ 08 /2024 रोजी मा.आयुक्त मनपा लातूर यांचे कक्षात सकाळी 10 :00 ते सायं.5:00 वाजे पर्यंत Walk-in-Interview (थेट मुलाखत ) आयोजित करण्यात आली आहे.

लातूर महानगरपालिका पदस्थापना

तक्ता क्र. ०१

राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियांन अंतर्गत रिक्त पदे (NUHM) थेट मुलाखत

| अ.क्र. | पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या | आवश्यक शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | एकत्रित मानधन | नियुक्ती | जातीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | वैदयकीय अधिकारी (पुर्ण वेळ) | 04 | MBBS /MMC Council कडील नोंदणी अनिवार्य | ७० वर्ष | ६००००/- | प्रा.ना.आ.केंद्र | अनु.जमाती १<br>विमुक्त जमाती अ १<br>इतर मागास प्रवर्ग १<br>सामाजिक आणि शैक्षणिक मागास प्रवर्ग १ |

तक्ता क्र. ०२

राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियांन अंतर्गत रिक्त पदे (NUHM) थेट मुलाखत

| अ.क्र. | पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या | आवश्यक शैक्षणिक अर्हता | वयो मर्यादा | एकत्रित मानधन | नियुक्ती | जातीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | अर्धवेळ वैदयकीय अधिकारी | 05 | MBBS /MMC Council कडील नोंदणी अनिवार्य | ७० वर्ष | ३००००/- | प्रा.ना.आ.केंद्र | लागू नाही |

तक्ता क्र. ०३

राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियांन अंतर्गत रिक्त पदे (NUHM)

| अ.क्र. | पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या | आवश्यक शैक्षणिक अर्हता | वयो मर्यादा | एकत्रित मानधन | नियुक्ती | जातीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | स्टाफ नर्स | 02 | GNM / Bsc Nursing Maharashtra Nursing Council कडील नोंदणी अनिवार्य | ६५ वर्ष | २००००/- | प्रा.ना.आ.केंद्र | भटक्या जमाती ब 1<br>आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक 1 |

तक्ता क्र. ०४

राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियांन अंतर्गत रिक्त पदे (NUHM)

| अ.क्र. | पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या | आवश्यक शैक्षणिक अर्हता | वयो मर्यादा | एकत्रित मानधन | नियुक्ती | जातीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Public Health Manager | 01 | MBBS OR Gradute in Health Sciences ( B.D. S/B.A .M.S/B. H.M.S/B.U.M.S/B.P.Th/Nursing Basic / P.B.Bsc)/ B. Pharm/ + MPH/MHA/MBA in Health care Admnistration | 18 to 38 years for Open category, 18 to 43 years for reserved categories | 32000/- | आरोग्य विभाग मुख्यालय | खुला |

➢ उपरोक्त वैद्यकीय अधिकारी पूर्णवेळ /अर्धवेळ वैद्यकीय अधिकारी यांनी सोबत जोडलेला अर्ज व प्रमाणपत्राच्या सांक्षाकीत केलेल्या छायाकित प्रति सह व मूळ कागदपत्रा सह इच्छुक उमेदवारांनी दि. 27 / 08 / २०२४ रोजी

Scanned with OKEN Scanner

सकाळी ठीक १०.०० वाजता मुलाखतीस उपस्थित राहावे. सायंकाळी ०५.०० नंतर येणाऱ्या उमेदवार मुलाखतीस पात्र राहणार नाही याची नोद घ्यावी .

- उपरोक्त स्टाफ नर्स /Public Health Manager या पदासाठी इच्छुक उमेदवारांनी यांनी सोबत जोडलेला अर्ज व प्रमाणपत्राच्या सांक्षाकीत केलेल्या छायाकित प्रति सह रिक्त असणाऱ्या पदासाठी जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून दिनांक ०९ /०८/२०२४ रोजी सायंकाळी ०५.४५ वाजेपासून सुट्टीचे दिवस वगळून ) नागरी सुविधा केंद्र विभाग महानगरपालिका लातूर.या ठिकाणी सकाळी १०.३० ते सायं ०५.४५ या वेळेत अर्ज सादर करावे व दिनांक २१/ ०८/ २०२४ रोजी सायंकाळी ०५.४५ नंतर आलेल्या उमेदवाराचा अर्जाचा विचार केला जाणार नाही .त्यानंतर आलेल्या उमेदवारांचा भरती प्रक्रीयेसाठी विचार केला जाणार नाही व तसेच ई मेल द्वारे प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही व तसेच सदरील जाहिरात व अर्जाचा नमुना WWW.NRHM.MAHARASHTRA.GOV.IN व WWW.arogya.maharashtra.gov.in या वेब वर प्रसिद्ध करण्यात आले आहे

**अटी व शर्ती :-**

1) Public Health Manager या पदा साठी खुल्या प्रवर्गातील उमेदवारासाठी १५०रु व स्टाफ नर्स या पदा साठी राखीव प्रवर्गातील उमेदावारासाठी १००रु चा धनाकर्ष (Demand Darft)एकात्मिक आरोग्य कुटुंब कल्याण सोसायटी लातूर शहर महानगरपालिका लातूर. या नावे जोडणे आवश्कयक आहे. सदरचा धनाकर्ष या नावाने काढावा धनाकर्ष हा राष्ट्रीयकृत बँकेचा असावा.

2) वैद्यकीय अधिकारी पुर्णवेळ NUHM व अर्धवेळ वैद्यकीय अधिकारी व या पदासाठी पात्र उमेदवारासाठी मुलाखत आयोजित करण्यात आली आहे.

3) अनुभवासाठी वैद्यकीय अधिकारी पदासाठी शासकीय तसेच खाजगी रूग्णालयातील अनुभव गृहीत धरण्यात येईल.

4) वरील सर्व पदे कंत्राटी स्वरुपाची व एकत्रीत मानधनाची असुन, त्यांचा कालावधी हा दि.२९ जून २०२५ पर्यंतचा राहू शकेल.परंतू, वरील पदे सन २०२४-२५ मध्ये मंजूर झाल्यास व आपले कामकाज समाधानकारक असल्यास पुढील ११ महिने २९ दिवसाची नियुक्ती देण्यात येईल.

5) वय वर्ष ६० नंतर जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून शारिरिक दृष्टया पात्र असल्याचे प्रमाणपत्र मुलाखतीच्या दिवशी सादर करणे अनिवार्य राहील तसेच निवड झाल्यानंतर प्रत्येकवर्षी सदर प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच पुर्ननियुक्ती आदेश देण्यात येतील.

6) उपरोक्त सर्व संबधित पदाकरीता तत्सम कॉन्सीलचे रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे अन्यथा उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

7) शासकिय सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या उमेदवारांना मानधन शासन निर्णय क. संकिर्ण २०१५/प्रक्र/१००/१३ दि. १७.१२.२०१६ व राज्य आरोग्य सोसायटी कडून प्राप्त मार्गदर्शक सुचनानुसार अदा करण्यात येईल.

8) वरील नमुद पदे ही राज्य शासनाची पदे नसून निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. सदर पदावर शासकिय सेवेप्रमाणे असलेले नियम अटी व शर्ती याबाबतचा हक्क व दावा राहणार नाही तसेच या पदासाठी शासनाचे सेवा नियम लागू नाहीत.

9) सामाजिक आरक्षण लागू असलेल्या अर्जदारांनी अर्ज करीत असलेल्या पदांचे नाव व सामाजिक आरक्षणानुसार सदर पदाकरीता नमुद प्रवर्ग (जातीचा प्रवर्ग) अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करावा.अश्या उमेदवारांनी अर्जासोबत जात प्रमाणपत्र (Caste Certificate) जोडणे आवश्यक राहील.

10) आवश्यक असणाऱ्या आरक्षित संवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या इतर संवर्गातील उमेदवारांचा गुणानुक्रमे विचार करण्यात येईल व आरक्षित संवर्गातील उमदेवार उपलब्ध होईपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती देण्यात येईल.

Scanned with OKEN Scanner

11) केंद्र / राज्य शासनाने संबंधीत पद नामंजूर केल्यास उमेदवाराची सेवा कोणतीही पूर्वसुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल.

12) उमेदवारांनी शैक्षणिक अर्हतेची पदवीचे सर्व गुणपत्रक (पहिले वर्ष ते अंतिम वर्ष), पदवी प्रमाणपत्र, नोंदणी प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, वय, अधिवास व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, वयाचा पुरावा म्हणून (१० व १२ वीचे प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला, जन्माचा दाखला) ही सर्व कागदपत्रे अर्जासोबत झेरॉक्स प्रतीत (साक्षांकित / स्वसांक्षाकिंत) जोडावीत. नावात बदल असल्यास राजपत्र, विवाह नोंदणी आणि नोटराईज्ड ॲफिडेव्हीट जोडणे बंधनकारक राहील.

13) अर्जदार हा संबधित पदासाठी शारीरिक व मानसिक दृष्ट्या सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

14) अर्ज सादर करणेकामी व मुलाखतीकरीता उपस्थित उमेदवानांना प्रवासभत्ता व इतर कुठलाही भत्ता देय राहणार नाही.

15) भरती प्रक्रिया स्थगीत करणे / रद्द करणे / पदभरतीत बदल करण्याचे सर्व अधिकार तसेच रिक्त पदांच्या संख्येत, सामाजिक आरक्षण, तसेच पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार हे या कार्यालयाचे असुन निवड प्रक्रियेत कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकार मा.आयुक्त तथा अध्यक्ष निवड समिती. लातूर शहर महानगरपालिका, लातुर यांनी राखुन ठेवलेले आहेत.

16) अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोईनुसार ठिकाण बदलून मिळण्याची मागणी करता येणार नाही.

17) अर्जाचा नमुना हा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला असून, सदरील नमुन्याप्रमाणे अर्ज नसल्याम, उमेदवाराचा अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही.

18) मुलाखतीनंतर निवड झालेल्या उमेदवारांना करारपत्रातील अटी मान्य असल्याबाबत रु.१००/- बॉन्ड पेपरवर करारनामा पदावर रुजू होताना सादर करावा लागेल.

19) निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांमध्ये नियुक्तीच्या ठिकाणी रुजू होणे बंधनकारक राहील अन्यथा त्यांची नियुक्ती आदेश संपूष्टात आणून प्रतिक्षा यादीतील पुढील उमेदवारास नियुक्ती देण्यात येईल.

20) इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीच्या दिवशी शैक्षणीक अर्हता, अनुभव, जात प्रमाणपत्र इत्यादी साक्षांकीत प्रतिंसह व मुळ कागदपत्रासह मुलाखतीसाठी हजर रहावे.

21) गुणाकंन यादी तयार केलेनंतर दोन किंवा जास्त उमेदवारांना समान गुण असल्यास ज्या उमेदवाराचे वय जास्त आहे अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. व तसेच उमेदवाराचे गुण व वय सारखे असल्यास अशा वेळी उमेदवारांचा संबंधित पदाशी निगडीत अनुभव जास्त असेल अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

22)मुलाखत पूर्ण झाल्या नंतर देखील पूर्ण वेळ /अर्ध वेळ वैद्यकीय अधिकारी या पदाचे पद रिक्त राहिल्यास महिन्याच्या शेवटच्या बुधवारी मुलाखत आयोजित करण्यात येईल ,या बाबतीत सर्व अधिकार मा आयुक्त मनपा लातूर यांचे राहतील .

SD -/-
अध्यक्ष निवड समीती तथा
आयुक्त
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

# कंत्राटी पदाकरिता कार्यालयीन अर्जाचा नमुना सन २०२४-२५
## राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान, आरोग्य विभाग,
## लातूर शहर महानगरपालिका, लातूर

**प्रति,**

मा.आयुक्त, तथा अध्यक्ष, निवड समिती
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

पासपोर्ट आकाराचा अलीकडील छायाचित्र स्वतः साक्षांकीत करुन लावावे करावे

पदाचे नाव :- .............................................

१) उमेदवाराचे संपूर्ण नांव:- .............................................

२) उमेदवारांच्या वडिलांचे संपूर्ण नांव-.............................................

३) जन्म तारीख - अक्षरी – वर्ष ................ महिना ................... दिवस ..................

अक्षरी:- ..........................................................................................................

वय :- ............. वर्ष पूर्ण ............... महिने ............. दिवस ........... (जाहिरात प्रसिध्द झालेल्या दिवशी)

४) राहण्याचा पत्ता :- ..........................................................................................

..........................................................................................

५) पत्र व्यवहाराचा पत्ता :- ..........................................................................................

..........................................................................................

(मोबाइल क्र. :-....................................... (नमुद करणे अनिवार्य)WhatsApp सुविधा चालू असलेला मो.क्र.देण्यात यावा.

ई-मेल आयडी :- ..........................................................................................................(नमुद करणे अनिवार्य)

५) अर्जदाराकडे रहिवाशी प्रमाणपत्र आहे ? होय / नाही

६) अर्जदाराकडे जातीचे प्रमाणपत्र आहे होय/नाही (राखीव प्रवर्गातील उमेदवारांसाठी)

७) धनादेश क्र........................ दि................ बँक ..............................(Public Health Manager & SN करीता लागू)

जातीचा प्रवर्ग .....................

- अर्जदार अर्ज सादर करत असलेल्या पदाचा आरक्षण प्रवर्ग ........................ (नमुद करणे अनिवार्य)
  (आरक्षित संवर्गातील उमेदवारांनी जात प्रमाणपत्र (Caste Certificate) / संबधीत प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य)

Scanned with OKEN Scanner

७) अर्ज करीत असलेल्या पदाच्या आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास नमूद करावे :-

..............................................................................................................................................

९) अर्जदार विवाहित आहे किंवा नाही - आहे /नाही.

९) शैक्षणिक पात्रता :-

| धारण केलेली पदवी अर्हतेचा तपशील (सर्व) | बोर्ड / विद्यापीठाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१०) अनुभव (अनुभवाची साक्षांकित प्रत जोडावी)

| अ.क्र. | ज्या कार्यालयात काम केले आहे त्या कार्यालयाचे नाव व पत्ता | शासकीय /खाजगी | धारण केलेले पद | सन | कालावधी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | वर्ष | महिने | दिवस |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

११) अर्जासोबतखालील साक्षांकित प्रती जोडल्या आहेत.(सर्व कागदपत्रांवरती पृष्ठ क्रमांक नमुद करावा)

1. ..................................
2. ..................................
3. ..................................
4. ..................................
5. ..................................
6. ..................................
7. ..................................
8. ..................................
9. ..................................
10. ..................................

१२) वर नमुद केलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरा आणि बरोबर आहे. या पदासाठी विहित केलेली शैक्षणीक अर्हता मी धारण करीत आहे. याची खात्री करुनच हा अर्ज मी करीत आहे मी असेही प्रमाणित करतो / करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास नोकरी गमावल्यास व त्या अनुषंगाने होणाऱ्या सर्व कारवाईस मी पात्र व बांधील राहील व त्याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही. तसेच जाहिरातील नमुद केलेल्या सर्व अटी व शर्ती मी वाचले असून त्या मला मान्य आहेत.

ठिकाण -

दिनांक - / /२०२४

स्वाक्षरी :-

अर्जदाराचे संपूर्ण नाव :-

मोबाईल क्र.:-

Scanned with OKEN Scanner